MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक – दिपक थोरात

अंबाजोगाई (प्रतिनिधी)
येथील ब्राम्हण ऐक्य परिषद व पेशवा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या जयंती निमित्ताने सामूहिक वंदे मातरम गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी सामाजिक कार्यकर्ते,नंदकिशोर मुंदडा,राजकिशोर मोदी,डॉ.अतुल देशपांडे, शैलेष गोस्वामी, अविनाश मुडेगांवकर,अक्षय मोहरीर,पद्मनाथ कुंबेफळकर,अवधुत देशपांडे,सुमित केजकर, राहूल देशपांडे,सागर दिक्षित,राघवेंद्र देशपांडे, अमोल कुलकर्णी,गिरीष देशपांडे,मनोज जोशी,डॉ.प्रज्वल देशपांडे,उमेश माके, योगेश कुलकर्णी,अजय पांडे,अक्षय खडके, संतोष देशपांडे,मुकूंद घाटे,कल्पना गोस्वामी, जया मुडेगांवकर,प्रज्ञा रामदासी,कल्याणी विर्धे,प्रतिक्षा बर्दापुरकर,उमा जोशी, गिताजंली कुलकर्णी, माधुरी कराडे,आदींसह इतर महिला,युवक उपस्थित होते.
यावेळी मान्यवरांनी सावरकरांनी देशाला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी प्राण पणाला लावले त्यांचे हे अत्युच्च देशप्रेम आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी आहे असे मत उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केले.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२४७ | गुरूवार दि.३० मे २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -247 | THURSDAY DT. 30 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बायको उपजिल्हाधिकारी टिळेकरांची आणि पासबुक लाचखोर हरिभाऊ खाडे यांच्या घरी कसं काय?

भाग्यश्री नामदेव टिळकारांचे ६४ लाख जिजाऊ मल्टीस्टेट मध्ये होते का?

नामदेव टिळकारांकडे ६४लाख रुपये त्यांच्या पत्नीच्या नावे टाकण्यासाठी कुठून व कसे आले असतील याची चौकशी करणे गरजेचे?



गेल्या सहा ते सात महिन्यापासून लाखो राज पोलीस अधिकारी हाडे आणि कुठे दोघे संपर्कात होते त्यामुळे कुठेंवर गुन्हा दाखल होत नव्हता खाडे विरोधात एसीबीने गुन्हा दाखल करतात गुन्हा दाखल होण्यास सुरुवात झाली पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्यावरही गंभीर आरोप केलेले आहेत कारण की बीड जिल्हा तील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सुरेश कुठे अर्चना कुठे यांच्या विरोधात तक्रारी करायला गेल्यानंतर त्या ठिकाणचे पोलीस अधिकारी हे एस पी नंदकुमार ठाकूर व हरिभाऊ खाडे ला विचारल्याशिवाय गुन्हा दाखल करत नव्हते व त्या ठिकाणावरून त्या व्यक्तीचा गुन्हा नोंद न करता त्याचा समाधान करून वाट लावण्याचा काम या बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस स्टेशनमध्ये झालेले आहे

बीडचे तत्कालीन उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर यांच्या पत्नी उत्सव भाग्यश्री नामदेव टिळेकर यांचे जिजामाता स्टेट मधील नागपूर हरिभाऊ खाडे यांच्या घरी सापडल्यामुळे हे पासबुक त्यांच्या घरी कसे सापडले हा प्रश्न यावेळी जनतेला सतवत आहे तर यावेळी हरिभाऊ खाडे यांच्या घरी पासबुक सापडल्यामुळे टिळेकर यांच्या अडचणी वाढलेले आहेत विशेष म्हणजे नामदेव टिळेकर यांनी जिजाऊ मल्टी स्टेट म्हणून ६४ ६५ लाख रुपये केल्याची माहिती काही दिवसापूर्वीच बीड शहरांमध्ये चर्चा जोर धरू लागली होती त्यामुळे त्यावेळेसही याची चौकशी झाली होती नामदेव टिळेकर यांनी ६४ ते ६५ लाख रुपये कुठून आणले त्यांच्या पत्नीची पाच ग्लासपुर खाडीच्या घरी कसे गेले लाचखोर खाडे यांच्या यांच्या घरी सापडल्यानंतर टिळेकरांनी नामदेव खाडे सोबत यांचे एका ठिकाणी रात्रीच्या वेळी पार्टी केल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे त्या पार्टीतूनच टिळकांनी माझे जिजाऊ मध्ये अडकलेले पैसे काढून द्या म्हणून हरिभाऊ खाडे यांना सांगितले व त्या ठिकाणी हाडेला सुद्धा टक्केवारी दिल्याची चर्चा यावेळी बीड जिल्ह्यामध्ये ऐकायला मिळत आहे. किती पैसे घेतले या सर्व बाबी आता सर्व तपास करत असताना टिळकरांचं अडचणी मात्र नक्कीच वाढ झालेली आहे कारण टिळकारांकडे इतके पैसे कुठून आले व ते पैसे किती दिवस या बँकेमध्ये होते व ते पैसे आणणे कोणी लोकांनी भरले होते का असा प्रश्न यावेळी उपस्थित होत आहे?

लाचखोर हरिभाऊ खाडे टिळेकर सुरेश कुठे सह अन्य जणांचे कॉल डिटेल काढणे गरजेचे आहे या कॉल डिटेल व्हाट्सअप कॉल वरती काय संभाषण झाले हे तपास खूप मोठी कसरत आता करावा लागणार आहे आणि यावेळी त्यांनी याच प्रकरणांमध्ये तपास करून खाडीचे सर्व कॉल डिटेल मागवले आहेत परंतु ती व्हाट्सअप वर जास्त बोलत असल्यामुळे खाडेचे व्हाट्सअप कॉल करत होता एसीबीने पुढे शरण येण्यापूर्वी त्यांनी सर्व डिटेल डिलीट केले होते आता हा सर्व डाटा रिकव्हर करण्याची कारवाई मात्र एसीबी कडून चालू आहे त्याचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे सत्य समोर नक्कीच आल्याशिवाय राहणार नाही.

बीड /प्रतिनिधी
जिल्ह्यातील अनेक मल्टीस्टेट बँका ज्ञानराधा जिजाऊ साईराम राजस्थानी सह मल्टीस्टेट आज पैसे घेऊन या संस्थेचे संचालक यांनी कोट्यावधी रुपयाची स्वतःच्या नातेवाईकाचे स्वतःच्या साठी मालमत्ता खरेदी करून एसी मध्ये राहणारे बंगले गाडी घेऊन हे पैसे तिकडे दिले आहेत जमीन प्लॉटिंग पैसा हा गोरगरीब जनतेचा लुबाड लुबाडत मल्टीस्टेट वाल्या अर्जुन पती होऊन बसले आहेत परंतु याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यातील आर्थिक गणेश शाखेचे पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांना एक कोटीच्या लाच प्रकरणी काही दिवसापूर्वी अटक करण्यात आलेली आहे संबंधित याच प्रकरणांमध्ये आर्थिक गुन्हे शाखेचे लाचखोर पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांच्या सध्या एसीबी सोडून कसून चौकशी होत आहे घरात कोट्यावधीचे घबाड सापडल्यानंतर हरिभाऊ खाडे रेसिपीच्या चौकशीसाठी खाड्यांचे अनेक कारणाने समोर येत आहेत तर खाडे च्या लाट प्रकरणामुळे अनेकांची कुंडली बाहेर येत आहे खाड्यांच्या घरात चक्क सुरेश कुठे आणि कुलकर्णी यांचा पासपोर्ट सापडला तर आता बीडचे तत्कालीन उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर यांच्या पत्नी सौभाग्य श्री नामदेव टिळेकर यांचेही पासबुक सापडले असून एकच खळबळ मिळाले आहे एखाद्या अधिकाऱ्याची पासबुक आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक कडे कसे असू शकते बीडच्या तत्कालीन उपजिल्हा अधिकारी पदी नामदेव टिळेकर हे होते यांच्याकडे भूसंपादन सह अन्य कारभार बीड जिल्हाधिकारी कार्यालयात होता टिळे हे नेहमीच वादग्रस्त बीड जिल्ह्यामध्ये या अगोदर सुद्धा सापडलेले असतानाच त्यांच्या पत्नी सौ भाग्यश्री नामदेव टिळेकर यांचे पासबुक एका लाचखोर अधिकाऱ्याच्या घरी कसा सापडतो? हा प्रश्न आता ऐरणीवर आला असून बीड जिल्ह्यामध्ये नव्हे तर महाराष्ट्रामध्ये सध्याच्या परिस्थितीमध्ये ही बातमी व्हायरल होत आहे यावेळी असे एक ना एक कारणाने यावेळी लाचखोर हरिभाऊ खाडे पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा याने एक कोटी रुपयाची लाच मागील त्याच्या नंतर हे कारणाने याच लाच प्रकरणामुळे उघड केस आलेले आहेत असे एक ना एक अनेक प्रश्न उपस्थित होत असून सुरेश कुठे कुलकर्णीसह नामदेव टिळेकर यांची ही आता याकडूनही चौकशी होण्याच्या मार्गावर आहे मिळालेली माहिती अशी आहे तर जिजा मल्टीस्टेट प्रकरणात तपासासाठी स्थापन करण्यात आलेली एसआयटी चे तपास अधिकारी डीवायएसपी विश्वंभर गोल्ड हे विद्यमान बीड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात डीवायएसपी या पदावरती आहेत एसीपी ने नोटीस दिली असून त्यांनाही या चौकशीसाठी हजर राहण्याची आदेश यावेळी एसीबीने दिलेले आहेत एसीपीकडून चौक पासून चौकशी होणार असून डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांची आजही अडचण वाढलेली दिसत आहे डी वाय एस पी गोल्डे तपास कामी बाहेर गावी असल्यामुळे त्यांनी वेळ वाढवून मिळण्याची विनंती एसीबी कडे केलेली आहे या अपुरा तपास राहिल्यामुळे एसीबीने अजून चौकासाठी कालावधी मागितला असून एक जुलै पर्यंत लाचखोर पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा हरिभाऊ खाडे याला एक जुलैपर्यंत पीसीआर देण्यात आलेला आहे घरास सापडले घबाडपट्टीवरील कोणाकडून घेतले? व हा तपास आता बीड एसीबी करत आहे केलेली कारवाई अत्यंत योग्य पद्धतीची आहे याच लाचखोर खाडे अनेक गोरगरिबांचे पैसे लुगडणारे बँका वाल्यांना संरक्षण देत स्वतः माया जमिनीची चर्चा बीड जिल्ह्यामध्ये या अगोदर सुद्धा ऐकायला मिळत होती परंतु खाडेच्या एक कोटीच्या लाचेमुळं हे सर्व प्रकरण बाहेर पडून या ठिकाणी कुठेतरी गोरगरीब मल्टीस्टेट मधील ठेवीदारांना न्याय मिळत अशी अपेक्षा एसीबी कडून बीड जिल्ह्यातील जनता करत आहे.

एक कोटीची लाच प्रकरणात हरिभाऊ खाडे सर इतर दोन जणांवर गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत यातील लाच स्वीकारणारा जैन नावाचा व्यक्ती याचा जामीन अर्ज कोर्टाने फेटाळला आहे यास फरार असलेले जाधवर यांचा तपास सुरू आहे तसेच या प्रकरणात जे जे सहभागी असतील त्या कोणालाही आम्ही सोडणार नाहीत शासकीय कामात लाचीची मागणी होत असेल तर नागरिकांनी नक्कीच बीड एसीबी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन
उपअधीक्षक शंकर शिंदे एसीबी कार्यालय बीड.

बीडचे डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांची ही एसीबी कडून चौकशी..

बीडचे पोलीस उपाधीक्षक विश्वंभर गोल्डे हे जिजाऊ मल्टीस्टेट प्रकरणात स्थापन केलेल्या एसआयटी चौकशी तपाशी अधिकारी आहेत तर लाचखोरहरीभाऊ खाडे हा सहाय्यक पोलीस निरीक्षक होता. त्यामुळे लाचखोर हरिभाऊ खाडे प्रकरणी चौकशीसाठी डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांना उपस्थित राहण्याचे पत्र एसीबीच्या कार्यालयातून देण्यात आलेले आहे पत्र प्राप्त होताच डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांनी तपासाच्या नावाखाली दिल्लीला जाण्याची पसंती दर्शवली आहे? अशी चर्चा बीड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात ऐकायला मिळत आहे सध्या डीवायएसपी विश्वंभर गोल्डे हे शासकीय तपासासाठी दिल्लीला असल्यामुळे त्यांनी एसीबी कार्यालयाला मेल करून वेळ वाढवून देण्याची विनंती केली आहे. आर्थिक विभागाचे प्रमुख म्हणून विश्वंभर गोंल्डे हे कामकाज पाहतात हरिभाऊ खाडेच्या लाचखोरीत विश्वंभर गोल्डे चाही काही हातभार आहे का? या दिशेने आता एसीबी तपास करत आहे.
यामुळे यात आणखी प्रत्यक्ष प्रत्यक्ष कोणाची साथ दिसून आल्यास डीवायएसपी विश्वंभर गोडे सुद्धा सुद्धा अडचणी देऊ शकतात.? त्यामुळे त्यांचाही काळजाचा ठोका वाढला असल्याने ते एसीबी समोर गेल्यानंतर चित्र स्पष्ट होईल!

भूसंपादन मध्ये अनेक जणांना परेशान करणाऱ्या टिळेकरला पापाची फेड इथेच करावी लागणार?

नामदेव टिळेकर भूसंपादन उपजिल्हाधिकारी कार्यालयातून अनेक वेळा तक्रारीच्या भौऱ्यात अडकलेले नामदेव टिळेकर याचे उत्तर देतील का?
भूसंपादन मध्ये टिळेकरणे कोट्यावधी रुपये कमविण्याची चर्चा बीड जिल्हाधिकारी कार्यालयात जोर धरू लागली

सायं.दै. बीड रिपोर्टर
संपादक : शेख तय्यब
Epaper : www.BeedReporter.com
सायंकाळ दैनिक बीड रिपोर्टर च्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!

:: शुभेच्छुक ::
दिपक थोरात
सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ परिवार

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सर्वजन कल्याणकारी पहिल्या भारतीय महिला राज्यकर्त्या...!

भारतात खऱ्या अर्थाने समाज सुधारकांची चळवळ इंग्रजांच्या राज्यात महात्मा फुले यांनी सुरू केली हाच आदर्श घेवुन छत्रपती शाहू महाराजांनी राजे असुनही समाज सुधारकाचे काम केले सावित्रीबाई फुले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पेरियार रामास्वामी नारायण गुरु अण्णाभाऊ साठे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाज सुधारकाचे काम केले भारतीय स्त्री तर कोणत्याही जाती धर्माची असली तरी तिला शुद्र म्हणूनच गणूक मिळत होती अशा काळात थोर क्रांतीकारी सामाजिक राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होऊन गेल्या महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतातील पहिल्या क्रांतीकारी समाजसुधारक महिला राज्यकर्त्या ठरतात अहिल्यादेवी चा जन्म ३१ मे १७ २५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याचा झेंडा टकेपार लावणारे आणि मध्य प्रदेशात हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे मल्हार रावजी होळकर हे अहिल्यादेवी चे सासरे होते त्यांनी प्रजेच्या हिताचे सुख शांतीचे राज्य निर्माण केले राजाचा वारसा पुत्र खंडेरावाचा मृत्यू झाला रुढी परंपरेने सती जाण्याची वेळ अहिल्यादेवी वर आली अहिल्यादेवी ला सती न जाऊ देता तिच्या हाती राज्यकारभार संपविण्याचे काम मल्हाररावांनी केले अहिल्यादेवी ने सती जाण्याचा रुढी रिवाज तोडून लोक निंदेला ना जुमानता आपण मेलो तर आपल्याला सुख मिळेल परंतु जगलो तर आपल्या लाखो प्रजाजनांना ख मिळेल म्हणून सती न जाण्याचे ठरवून रूढीग्रस्त धर्माच्या विरुद्ध क्रांतिकारी पहिले बंड केले भारतीय स्त्रीला शिक्षणाचा राज्य करण्याचा अधिकार नव्हता त्याविरुद्ध क्रांतीकारी दुसरे बंड करुन अहिल्यादेवींनी राज्य कारभाराची सूत्रे हाती घेतली कुटुंबातील सासरा नवरा मुलगा या सर्वांच्या मृत्यूनंतर जनकल्याणासाठी मनोधर्य खचून न देता धैर्याने अहिल्याबाईंनी राज्यकारभार संभाळला त्याचा जास्तीत जास्त वेळ समाज कल्याणासाठी देत अहिल्यादेवींनी प्रजेला त्रास देणार यांना पकडून आणून सामोपचाराच्या गोष्टी सांगून त्यांना जगण्यासाठी जमिनी देऊन चांगल्या मार्गाला लावले त्याचे संसार सुखा समाधानाने फुलविले प्रजेचा छळ न करता प्रजेला परवडेल एवढाच कर वसूल केला करा पासून वसुल केलेला पैसा लोकांच्या हिताकरिता खर्च केला न संपत्ती ही व्यक्तिगत मालमत्ता नसुन देवाने आणि जनतेने योग्य रितीने विनियोग ण्याकरिता आपल्या स्वाधीन केलेला तो एक ठेवा आहे असे त्या समजत वारसा नसेल तर दत्तक घेण्याचा व स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार अहिल्यादेवींनी प्रजेला दिला होता रजेचे सुख-दुःख स्वतः प्रत्यक्ष ऐकून घेऊन भेटण्यासाठी प्रजेला वेळ देत आणि स्वतः न्यायाधीशाच्या प्रमाणे काम करीत अहिल्यादेवीच्या राज्यात जातीभेदाला थारा नव्हता त्या प्रजा सारखीच मानीत असत याचा परिणाम असा होईल की विविध राज्यातील लोकसुद्धा आम्ही तुमच्या राज्यात राहायला येतो असे त्यांना मनात

एकंदरीत अहिल्यादेवींची जा संतुष्ट व सुखी होती कारण प्रजेचा संतोष हाच राज्याचा पाया आहे असा अहिल्याबाईंचा विचार होता प्रजेचा सांभाळ लेकरा प्रमाणे करणे हा राजधर्म असल्याचे पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर मानत य कारभारातील कोणत्याही अधिकाऱ्याने अथवा जवळच्या माणसाने प्रजेकडून पैसे उकळले तर अहिल्यादेवी त्याला ताबडतोब शिक्षा करीत आणि त्याचे अधिकार काढून घेत त्याचा प्रशासनावर वचक होता सर्व जनतेला न्याय मिळावा म्हणून न्यायालयाची स्थापना गावागावात पंचायतीची स्थापना न्याय मिळविण्यासाठी अर्ज करण्याची व्यवस्था प्रत्यक्ष राजा ला भेटून न्याय मिळविण्याची यवस्था पोलीस यंत्रणा गाव गाव कोतवालाची पदे निर्मीती तसेच कृषी आणि वाणिज्य क्षेत्राच्या उत्कर्षा वर जास्त भर देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात आला होता प्रजेसाठी रस्ते पुल घाट धर्मशाळा विहीरी तलाव बांधले होते बेरोजगारांना रोजगार मिळण्यासाठी रोजगार धंद्याची योजना राबविण्यात आली होती रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वृक्षरोपण केले होते भाविक गोर-गरीब लोक तीर्थ यात्रेला जात असत व तेथे त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून अन्नदानाची छत्रे राहण्यासाठी धर्मशाळेची सोय हे फक्त होळकरांच्या राज्यातच नव्हे तर संपूर्ण भारतातील इतर राज्यात सुध्दा प्रत्येक तीर्थयात्रेच्या ठिकाणी सोय अहिल्यादेवींनी उपलब्ध केल्या होत्या अहिल्यादेवींनी शत्रूचा बंडवाले समाज घटकांचा बिमोड करून त्याचे पुनर्जीवन केले आणि राज्यात शांतता प्रस्थापित केली राज्यकारभार समाज व्यवस्था कायदे कानून वगैरे बाबत सुधारणा केल्या त्यामुळे प्रजा अहिल्याबाईंच्या सामाजिक राजकीय कार्यावर संतुष्ट होती अहिल्याबाईंचे राजकारण एकंदरीत शांततेचे होते त्यामुळे राज्यात शांतता व सोबत लाभली याची नोंद पंडीत नेहरुनी देखील केली होती म्हणूनच त्यांना शांतताप्रिय राज्यकर्ते असे म्हणतात अहिल्यादेवींने इ,स १७६५ ते १७९५ या दीर्घ कालावधीत राज्य केले १३ ऑगस्ट १९९५ रोजी लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवीचा मृत्यू झाला अहिल्यादेवीच्या राज्य कारभाराबद्दल आणि सामाजिक कार्याबद्दल राठी उर्दु इंग्रजी कवी लेखकांनी फार मोठ्या प्रमाणात साहित्य लिहून ठेवलेले आहे इतर राज्याची तुलना केली तर त्या काळात अहिल्याबाई फार मोठ्या सामाजिक क्रांतिकारक राज्यकर्त्या होऊन गेल्या हे सूर्यप्रकाशइतके स्पष्ट सत्य समोर येते स्वातंत्र्यानंतर ४५ वर्षात लोकशाही प्रशासनाच्या योजनेत अनेक कलमी कार्यक्रम राबविले जात आहेत ते सर्व लोक मातेच्या राज्यात राबविण्यात आलेले दिसून येते अहिल्यादेवींचा प्रशासनावर फार मोठा वचक असल्यामुळे त्या समाजाला न्याय देऊ शकल्या धार्मिक सामाजिक आर्थिक सांस्कृतिक आघाडीवर महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी तब्बल ३० वर्षे समर्थपणे राबविलेल्या शासन यंत्रणेतून क्रांतिकारक कार्य केले यातून राजमातेची शक्ती आणि युक्ती दिसून येते त्या केवळ धनगर समाजाच्याच नव्हे तर तमाम भारतीय जनतेच्या आदर्श ठरतात लोक मातेच्या धार्मिक सांस्कृतिक आर्थिक सामाजिक आणि मुख्यत्व राजकीय प्रेरणा स्त्रोतातून किमान एक पेलू घेऊन धनगर तत्सम राष्ट्रीय समाजाने वाटचाल केली असती तर भारत भारतीय समाज आज एक मागास दुबळा देश समाज म्हणून ओळखला गेला नव्हता सम्राट चंद्रगुप्त मौर्यापासून ते होळकरांपर्यंत वैभवशाली व कल्याणकारी परंपरा असताना धनगर समाज पर्याय शासकीय प्रशासकीय आर्थिक राजकीय भागीदारी पासून वंचित आहे सर्व प्रकारच्या समतेची आम्ही भारतीय राज्यघटनेने भारतीय जनतेला दिली आहे सर्व समाज घटकांच्या सर्वांगीण विकासाला वाव देणाऱ्या विविध तरतुदी आपल्या प्रजासत्ताक भारताच्या राज्यघटनेमध्ये अंतभूत आहे असताना भारताच्या स्वातंत्र्याची ६५ वर्षे व भारतीय प्रजासत्ताकाची ६५ वर्षे उलटून जाऊनही राष्ट्रीय जीवनाच्या विविध क्षेत्रातील भागीदारी पासून वंचित का? तर याचे एकमेव कारण म्हणजे धनगर समाजाच्या हिताची जपणूक करणारा आजवर एकही प्रतिनिधी संसदेमध्ये गेला नाही महाराष्ट्रामध्ये धनगर समाजाची लोकसंख्या १७ टक्के असताना सुद्धा एकही खासदार आजपर्यंत निवडून का पाठविला नाही? महाराष्ट्र विधानसभेत लोकसंख्येच्या प्रमाणात ५० टक्के आमदार दर वेळी निवडून जायला हवेत पण आजपर्यंत कुठल्याही विधानसभेचे चार ते पाच त्यावर प्रतिनिधी गेले नाहीत याला जबाबदार कोण? धनगर समाजात राजकीय जागृतीचा अभाव हे प्रमुख कारण म्हटले तर वावगे ठरणार नाही मी हेरले किंबहुना धनगर तत्सम इतर समाजाच्या मागासपणाचे कारणही हेच असल्याचे मी जाणले मातंग बौद्ध लिंगायत मुस्लिम साळी माळी कोळी तेली वंजारी, सर्व समाजात पुण्यश्लोक अहिल्यादेवी बद्दल मला आदर भाव आढळला परंतु मराठी साहित्यात पुण्यश्लोक कोठे आहे? हिंदू धर्माने संस्कृती रक्षिता अहिल्यादेवींच्या नावाने

महाराष्ट्रात एकही सांस्कृतिक केंद्र का नाही? वृत्तपत्रे दूरदर्शन मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवीचे दर्शन का नाही? असे प्रश्न मला पडतात केवळ धनगर वाड्यातच अहिल्या जयंती व पुण्यतिथी का असावी प्रश्न मला पडतो तसेच यात हिंदू समाजाचा मराठी माणसाचा दोष नसून हा प्रचार-प्रसार यंत्रणेचा दोष आहे हे मी जाणतो तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी चे वारस देखील कमी पडले आसा माझे निरीक्षण आहे तात्पर्य पुण्यश्लोक असूनही अहिल्यादेवी उपेक्षित आहे त्याला जबाबदार कोण आहे आजमितीला संपूर्ण राज्यामध्ये इतर राष्ट्रपुरुष यांच्या जयंती पुण्यतिथी त्या सर्व जाती धर्माचे लोक करतात परंतु पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती धनगर समाज सोडता इतर जातीमध्ये साजरी केली जात नाही त्याला तितकेच जबाबदार धनगर समाजातील पुढारी देखील आहेत छत्रपती शिवरायांचा वारसा खऱ्या अर्थाने राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी ३० वर्षे सांभाळला सर्वजन कल्याणकारी राज्य कारभारामुळे प्रजा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अहिल्यादेवी मानू लागली धर्मशील अहिल्यादेवींनी राज्यकारभारासाठी तलवारही पकडली होती म्हणून इंदूरच्या वाटेला कोणी जात नव्हतं पुण्यश्लोक अहिल्यादेवी चा धार्मिक चेहरा लोकांसमोर आणला गेला होता परंतु तलवारधारी महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई चा राज्यकर्ता चेहरा लपविला गेल्याचे मी जाणले १९९४ साली तलवारधारी महाराणी अहिल्याबाई यांचा प्रचार हा सर्वप्रथम बहुजन समाजातील साहित्य संजय सोनवणे त्याचबरोबर हरी नरके साहेब यांनी सत्य समोर आणले त्यांना गैरसमजातून टीका टवाळी झाली त्यांनी सहन केली व त्यांनी जबाबही दिले पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांचे सामाजिक आणि राजकीय स्वरूप समोर आणण्याचे काम साहित्यिकांनी केले राजमाता पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर राजकर्त्या होत्या म्हणुन राजकारण करु शकल्या परंतु राज्यकर्ता धनगर समाज आपला मोठा वारसा विसरला राजा समाज प्रजा समाज बनला केवळ वोटर समाज बनला समाजातील राज्यकर्त्या नेत्यांमुळे आजमितीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार घेऊन उतरलेल्या नेत्यांना खुद धनगर समाजाचा विसर पडला आहे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत स्वखर्चातून मज्जित मंदिर त्याचबरोबर पशुपक्ष्यांसाठी पाणवठे दऱ्यांमध्ये बांधण्याचे काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या खरोखरच राज्यकर्त्या होत्या सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचे काम त्यांनी त्यांच्या राज्यकारभार मध्ये केले होते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नशीब २९ व्या वर्षी विधवापण आलेले होते इ,स १७९९ मध्ये अहिल्यादेवीचे सासरे महाराज मल्हाराव होळकर यांचे निधन झाले होळकरांचा आधारस्तंभ कोसळला आता मालेराव हा एकमेव आधार होता परंतु त्या खचल्या नाहीत इंदूर संस्थानाचे सारी सूत्रे आपल्या हातात घेऊन तीस वर्ष ना भूतो ना भविष्य आता राज्यकारभार केला या महान मातेला त्यांच्या २९९व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...!

जयंती विशेष

-दत्ता इंद्रमोहन वाकसे

बीड जिल्हाप्रमुख धनगर समाज संघर्ष समिती

मो-८३७८९८२१२१

कर्मयोगी राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर

भारत देशात अनेक राष्ट्रपुरुषांनी जन्म घेतला आहे. म्हणून भारताला थोरवीर रत्नांची खाण असे संबोधले जाते. अशातीलच एक महान स्त्री रत्न म्हणजे राष्ट्रमाता राजमाता अहिल्यादेवी होळकर होय. त्यांनी आपले समस्त जीवन लोक कल्याणासाठी अर्पण केले. त्यांची आज जयंती त्यानिमित्त त्यांच्या जीवन कार्याचा हा आढावा. त्यांनी जनते विषयी असणारी आत्मीयता, प्रेम आपुलकी जर आपणास पहावयाचे असेल तर त्यांच्या जीवन चरित्राचा आपल्याला अभ्यास करावा लागेल.

अहिल्यादेवी यांचा जन्म ३१ मे १७२५ आली, वडील माणकोजी शिंदे व आई सुशिलाबाई शिंदे यांच्या ' धनगर समाजात झाला. त्यांचें जन्मगाव अहमदनगर (अहिल्यादेवी) जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील सीना नदीच्या काठावर वसलेलं चौंडी हे होय. अहिल्याबाईनी आपल्या बालपणात विविध प्रकारचे शिक्षण परीक्षण घेतले. तत्कालिन दरबारी मोडी मराठी लिहिणे वाचणे, हिशोब करणे यांचे शिक्षण आत्मसात केले तसेच घोड्यावर बसणे दांडपट्टा खेळणे, राजकारणाचे व युद्धाचे डावपेच आखणे, लढाया करणे, तह करणे सूचक पत्रव्यवहार करणे न्यायदान आदीचे सूक्ष्म प्रशिक्षण घेतले. परिणामी त्यांची शारीरिक मानसिक सामाजिक दृष्ट्या बुध्दी परिपक्व झाली.

अहिल्याबाई यांचा विवाह राजश्री मल्हारराव व महाराणी गौतमाबाई यांचा १२ वर्षाचा एकुलता एक मुलगा शूरवीर खंडेराव यांच्याशी वयाच्या नवव्या वर्षी २० मे १७३३ साली संपन्न झाला. इ. स. १७४५ ला मुक्ताबाई व मालेराव अशी दोन अपत्य अहिल्यादेवी यांना झाली. अहिल्यादेवी यांचे पती शूरवीर खंडेराव कुंभेरीच्या रणसंग्रामात शहीद झाले. आणि त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. इ. स.१७६६ मध्ये सासरे राजश्री मल्हारराव यांच्या मरणोपरांत अहिल्यादेवीनी इंदोर (मध्यप्रदेश) राज्याची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली.

शासन व्यवस्था आपल्या ताब्यात घेतल्यानंतर आहील्यादेविनी अनेक समाजोपयोगी कार्य केली. ज्याचा आज उल्लेख केल्याशिवाय या लेखाला पूर्णत्व प्राप्त होणे शक्य नाही. भारत हा कृषिप्रधान देश आहे येथील लोकजीवन शेतीवरच अवलंबून आहे. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्याला आर्थिक मदतीचा हात दिला. कर वसुलीची मर्यादा निश्चित ठरवून दिली त्यामुळे शेतकऱ्यांना जादा शेत सारा द्यावा लागत नसे. शेती पूर्णतः पाण्यावर अवलंबून असल्यामुळे तलाव विहीर घाट व कुंडाची निर्मिती केली. शेतीला पूरक असे उद्योग चालू केले.

अहिल्यादेवी यांच्या शासन व्यवस्थेच्या काळात अनेक मंदिरे, मस्जिदी धर्मशाळा, रस्ते दवाखाने यांची निर्मिती केली. त्यामुळे वस्तुशिल्पी, शिल्पकार, गवंडी, लोहार, सुतार,सोनार, चर्मकार अशा अनेक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. कलावंत साहित्यिक, व कारागीर अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, घर पैसा व इतर सोयी सुविधा उपलब्ध केल्या.

सर्वधर्म समभावाचा आदर्श गिरवीत त्यांनी जुनी मंदिर व मस्जिदी यांचा जीर्णोद्धार केला. त्यांची साक्ष देत आजही काही वास्तू उभ्या आहेत. जसे कि परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिराची सुधारणा केली. तसेच त्यांनी अनेक पीर व मस्जिदी बांधल्या, खडेपीर, चांदवड, येथील नानावली दर्गा, या ठिकाणची जीर्णोद्धाराची कामे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केली. राज्यांतील प्रजेच्या रक्षणासाठी सैन्य व्यवस्था स्त्री सैन्य, पोलीस प्रशासन यांची नेमणूक केली. परराज्यातील वकिलांची नेमणूक करुन न्याय व्यवस्था बळकट केली.

राज्यकर्त्यांची भूमिका पार पाडत असताना त्यांनी समाज सुधारकांची भूमिकाही त्यांनी निर्भिडपणे पार पाडली. कोणत्याही समाज सुधराकाचा आपण अभ्यास केला. तर आपल्याला असे जाणवेल त्यांचें समाज परिवर्तनाचे कार्य हे तीन अवस्थामधून पुढे जात असते. उपहास विरोध आणि स्वागत काळाच्या पुढे पाहणाऱ्या दृष्ट्याचा नेहमीचं उपहास होतो म्हणुन विरोध हा आलाच. परंतु कालांतराने याचेच स्वागत होते. याचे जर उदाहरण पाहायचे झाले तर क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले समाज सुधारक होत्या. त्यांनी मुलींना शिक्षणं देण्याचा एतिहासिक निर्णय घेतला. त्यांना सुरुवातीला खूप टीका त्रास उपहास सहन करावा लागला. प्रखर विरोध झाला परंतु कालानुरूप त्याचेही स्वागत झाले. त्याच प्रमाणे अहिल्यादेवी यांना शासन चालवत असताना अनेक अडचणीला सामोरे जावे लागले. तरीपण त्या डगमगल्या नाहीत. अहिल्यादेवी राज्यकारभार चालवताना अनिष्ट रूढी समाजविघातक परंपरा यांना पायबंद घातला. हुंडा देणे आणि घेणे दोन्ही अपराध मानले जाऊ लागले. दारुबंदी, सतीप्रथा बालविवाह, केशवपन या अनिष्ट प्रथा बंद केल्या. त्यांनी त्यासाठि कठोर कायदे केले व त्याची प्रभावीपने अमलबजावणी केली. अहिल्यादेवी म्हणत ज्या रूढी अंधकाराकडून प्रकाशाकडे नेतात त्या रूढी आम्हाला मान्य आहेत परंतु प्रकाशाकडून अंधाराकडे ज्ञानकडून अज्ञानाकडे नेणाऱ्या रूढी आम्हास मान्य नाही.

शासनकर्ता हा जनतेच्या पैशाचा मालक नसतो तर तो त्यांचा विश्वस्त असतो त्या पैशाची उधळपट्टी करण्याचा त्यास काहीही अधिकार नाही असे त्यांचे तत्व होते. अहिल्यादेवी यांचा राज्यकारभार समर्पित वृत्ती धर्मपारायणात, परधर्म सहिष्णुता, अन्यायाची चीड दुर्बलांचे रक्षण स्वातंत्र, समता बंधुता न्याय, विकास दुष्टांना शासन आणि

गुणवंतांना आसन अशा तत्वावर चालत असे.

आपण इतिहासातील अनेक राष्ट्रपुरुषांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करतो तेंव्हा आपल्याला असे जाणवते की अशा व्यक्तीचे जीवन म्हणजे एक संघर्ष यात्राच असते. मग याला अहिल्यादेवी कशा अपवाद ठरतील. त्यांना स्वतःच्या जवळीक आप्तेष्टांचा विरह पहावा लागला. तत्कालीन समाजामध्ये एका स्त्रीने राज्यकारभार चालवावा म्हणजे एक दिव्यच शत्रू राष्ट्रांची आक्रमणे ब्रिटिशांची राज्यावरील नजर, राज्यकारभारातील अंतर्गत कलह, वाईट प्रथा बंद करण्यासाठी झालेला समाजातील दुष्ट लोकांचा विरोध अशा एक ना अनेक संकटांना त्यांनी समर्थपणे तोंड दिले कदाचित याही कारणामुळे इतिहासाला त्यांची नोंद घ्यावी लागली असेल. संधी आणि स्वकर्तृत्व यांची बेरीज म्हणजे अहिल्यादेवी होळकर. त्यांना राज्यकारभार चालवण्याची संधी मिळाल्यावर आपल्या स्व: निर्णयावर त्यांनी संधीचे सोने केले व इतिहासात आपल्या कार्याचा ठसा उमटवला. नेतृत्व कायम तडजोडीची भाषा बोलत नसते त्याचप्रमाणे त्यांनी जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांविषयी कधीही तडजोड केली नाही. अहिल्यादेवी होळकर या आपल्या समाजासाठी अखंड ऊर्जादायी प्रेरणास्त्रोत आहे. आज समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्व जाणवले आहे. त्यामुळे समाज प्रगती करत आहे. पण यावर समाधान मानून चालणार नाही. खूप मोठ्या प्रमाणात प्रगती करावयाची आहे. अडचणी खूप आहेत पण यातूनही मार्ग काढणे गरजेचे आहे. राजकीय स्तरावर आरक्षण असेल किंवा इतर मागण्या त्यासाठि सातत्याने पाठपुरावा होणे आवश्यक आहे. आपला जो हक्क आहे. त्याबाबत सर्वांनी जागरूक असणे ही खूप चांगली गोष्ट आहे. पण कर्तव्याबाबत आपण कसूर करता कामा नये. आज अहिल्यादेवी यांची जयंती साजरी करत असताना अहिल्यादेवीच्या विचारांचा व कार्याचा देदीप्यमान वारसा आपल्याला समोर ठेवून वाटचाल करावी लागेल युवकांनी आजच्या दिवशी किंवा मिरवणुकी पुरते महत्व न देता सातत्याने विधायक कार्य करत राहीले पाहिजे. युवकांनी शिक्षणं शेती उद्योग नोकरी यामध्ये झोकून देऊन अपार कष्ट करण्याची मानसिकता तयार ठेवावी. शिक्षण तंत्रज्ञान नवीन बदल आत्मसात करुन आपली आपल्या कुटुंबाची समाजाची पर्यायाने देशाची प्रगती करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. कोणत्याही समाजाची, राष्ट्राची प्रगती तेथील युवकावरच अवलंबून असते. युवकांनी याबाबत जागृत असणे गरजेचे आहे. सामाजिक संघटनांनी देखिल समाजाची विधायक प्रगती होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. समाजाच्या शक्तीचा, वेळेचा,संपतीचा अपव्यय होणार नाही सामाजिक सलोखा बिघडणार नाही याची काळजी घ्यावी. अहिल्या देवी यांचा आदर्श समोर ठेवून वाटचाल करावी.

राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर घोड्यावर बसून युद्ध करणाऱ्या रणरागिणी होत्या. संकट समयी धैर्य दाखविणाऱ्या वीरांगना होत्या. राजदरबारात बसून न्याय देणाऱ्या शासन कर्त्या होत्या. समस्त भारतीय जनतेला पुत्रवत मानणाऱ्या संपूर्ण राष्ट्रात जन हिताचे कार्य करणाऱ्या राष्ट्रमाता होत्या. अशा या राष्ट्रमातेचे निधन १३ ऑगस्ट १७९५ साली झाले. इतिहासातील एक देदीप्यमान अध्याय संपुष्टात आला. त्यांच्या कार्य कीर्तीचा सुगंध कायम दरवळत राहील यात काही शंका नाही. अशा या भारतभूमीतील स्त्री रत्नाची २९९ वी जयंती निमित्त त्यांच्या या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

धन्यवाद...!!

संकलन श्री.गलांडे ए. बी.(सर) (निवेदक)

मो.९५६१२४९७६९.

कमल चंद्रा यांच्या चित्रपटावर बंदी घाला

ए.पी.जे.अब्दुल कलाम युवा मंच तर्फे दिले मुख्यमंत्री यांना निवेदन

माजलगाव (प्रतिनिधी)

भारतात सर्वत्र वादग्रस्त असलेले चित्रपट हम दो हमारे बाराह या चित्रपटावर बंदी घालण्यात यावी यासाठी माजलगाव येथील भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम युवा मंच या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सय्यद लतीफ व सर्व पदाधिकारी यांनी तहसीलदार तथा पोलिस निरीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन या चित्रपटावर बंदी घालावी असे निवेदन दिले.निवेदनात म्हटले आहे की, भारताची विविधता हीच भारताची एकता आहे. या एकतेला तडा देण्याचा प्रयत्न जातियवादी कमल चंद्रा या माथेफिरुणे चित्रपटाद्वारे केला आहे. या निर्मात्याने एक चित्रपट बनवला आहे त्याचे नाव हम दो हमारे बाराह असे असून तो सिनेमा पूर्ण पणे इस्लाम धर्माच्या विरुद्ध आहे. या चित्रपटामध्ये इस्लाम धर्माची शिकवण पूर्णपणे चुकीची दाखवलेली आहे, इस्लाम धर्माचा पवित्र ग्रंथ कुरानच्या आयती(श्लोक) खोट्या पद्धतीने सांगण्यात आलेले आहे व मुस्लिम समाजाला

महिलांवर अत्याचार करणारे दाखवलेले आहे जे की पूर्णपणे चुकीचे आहे यामुळे मुस्लिम समाजाचे भावना प्रचंड प्रमाणात दुखावले आहे. असा चुकीचा सिनेमा बनवून निर्माता कमल चंद्रा यांचा हेतू भारत राष्ट्राचे वातावरण खराब करण्याचा आहे अशी शक्यता असल्याने या चित्रपटावर बंदी घालावी व सोसिएल मीडियावरील व्हिडीओवर ही बंदी घालवी आणि निर्माता कमल चंद्रा यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी असे निवेदन देण्यात आले आहे. यावेळी ए.पी.जे. अब्दुल कलाम युवा मंच चे पदाधिकारी व विविध संघटने चे पदाधिकारी उपस्थित होते.

कर्मयोगी राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर

गेवराई (प्रतिनिधी)

भारत देशात अनेक राष्ट्रपुरुषांनी जन्म घेतला आहे. म्हणून भारताला थोरवीर रत्नांची खाण असे संबोधले जाते. अशातीलच एक महान स्त्री रत्न म्हणजे राष्ट्रमाता राजमाता अहिल्यादेवी होळकर होय. त्यांनी आपले समस्त जीवन लोक कल्याणासाठी अर्पण केले. त्यांची आज जयंती त्यानिमित्त त्यांच्या जीवन कार्याचा हा आढावा. त्यांनी जनते विषयी असणारी आत्मीयता, प्रेम आपुलकी जर आपणास पहावयाचे असेल तर त्यांच्या जीवन चरित्राचा आपल्याला अभ्यास करावा लागेल.

अहिल्यादेवी यांचा जन्म ३१ मे १७२५ आली, वडील माणकोजी शिंदे व आई सुशिलाबाई शिंदे यांच्या ' धनगर समाजात झाला. त्यांचें जन्मगाव अहमदनगर (अहिल्यादेवी) जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील सीना नदीच्या काठावर वसलेलं चौंडी हे होय. अहिल्याबाईनी आपल्या बालपणात विविध प्रकारचे शिक्षण परीक्षण घेतले. तत्कालिन दरबारी मोडी मराठी लिहिणे वाचणे, हिशोब करणे यांचे शिक्षण आत्मसात केले तसेच घोड्यावर बसणे दांडपट्टा खेळणे, राजकारणाचे व युद्धाचे डावपेच आखणे, लढाया करणे, तह करणे सूचक पत्रव्यवहार करणे न्यायदान आदीचे सूक्ष्म प्रशिक्षण घेतले. परिणामी त्यांची शारीरिक मानसिक सामाजिक दृष्ट्या बुध्दी परिपक्व झाली.

अहिल्याबाई यांचा विवाह राजश्री मल्हारराव व महाराणी गौतमाबाई यांचा १२ वर्षाचा एकुलता एक मुलगा शूरवीर खंडेराव यांच्याशी वयाच्या नवव्या वर्षी २० मे १७३३ साली संपन्न झाला. इ. स. १७४५ ला मुक्ताबाई व मालेराव अशी दोन अपत्य अहिल्यादेवी यांना झाली. अहिल्यादेवी यांचे पती शूरवीर खंडेराव कुंभेरीच्या रणसंग्रामात शहीद झाले. आणि त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. इ. स.१७६६ मध्ये सासरे राजश्री मल्हारराव यांच्या मरणोपरांत अहिल्यादेवीनी इंदोर (मध्यप्रदेश) राज्याची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली.

शासन व्यवस्था आपल्या ताब्यात घेतल्यानंतर आहील्यादेविनी अनेक समाजोपयोगी कार्य केली. ज्याचा आज उल्लेख केल्याशिवाय या लेखाला पूर्णत्व प्राप्त होणे शक्य नाही. भारत हा कृषिप्रधान देश आहे येथील लोकजीवन शेतीवरच अवलंबून आहे. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्याला आर्थिक मदतीचा हात दिला. कर वसुलीची मर्यादा निश्चित ठरवून दिली त्यामुळे शेतकऱ्यांना जादा शेत सारा द्यावा लागत नसे. शेती पूर्णतः पाण्यावर अवलंबून असल्यामुळे तलाव विहीर घाट व कुंडाची निर्मिती केली. शेतीला पूरक असे उद्योग चालू केले.

अहिल्यादेवी यांच्या शासन व्यवस्थेच्या काळात अनेक मंदिरे, मस्जिदी धर्मशाळा, रस्ते दवाखाने यांची निर्मिती केली. त्यामुळे वस्तुशिल्पी, शिल्पकार, गवंडी, लोहार, सुतार,सोनार, चर्मकार अशा अनेक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. कलावंत साहित्यिक, व कारागीर अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, घर पैसा व इतर सोयी सुविधा उपलब्ध केल्या.

सर्वधर्म समभावाचा आदर्श गिरवीत त्यांनी जुनी मंदिर व मस्जिदी यांचा जीर्णोद्धार केला. त्यांची साक्ष देत आजही काही वास्तू उभ्या आहेत. जसे कि परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिराची सुधारणा केली. तसेच त्यांनी अनेक पीर व मस्जिदी बांधल्या, खडेपीर, चांदवड, येथील नानावली दर्गा, या ठिकाणची जीर्णोद्धाराची कामे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केली. राज्यांतील प्रजेच्या रक्षणासाठी सैन्य व्यवस्था स्त्री सैन्य, पोलीस प्रशासन यांची नेमणूक केली. परराज्यातील वकिलांची नेमणूक करुन न्याय व्यवस्था बळकट केली.

राज्यकर्त्यांची भूमिका पार पाडत असताना त्यांनी समाज सुधारकांची भूमिकाही त्यांनी निर्भिडपणे पार पाडली. कोणत्याही समाज सुधराकाचा आपण अभ्यास केला. तर आपल्याला असे जाणवेल त्यांचें समाज परिवर्तनाचे कार्य हे तीन अवस्थामधून पुढे जात असते. उपहास विरोध आणि स्वागत काळाच्या पुढे पाहणाऱ्या दृष्ट्याचा नेहमीचं उपहास होतो म्हणुन विरोध हा आलाच. परंतु कालांतराने याचेच स्वागत होते. याचे जर उदाहरण पाहायचे झाले तर क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले समाज सुधारक होत्या. त्यांनी मुलींना शिक्षणं देण्याचा एतिहासिक निर्णय घेतला. त्यांना सुरुवातीला खूप टीका त्रास उपहास सहन करावा लागला. प्रखर विरोध झाला परंतु कालानुरूप त्याचेही स्वागत झाले. त्याच प्रमाणे अहिल्यादेवी यांना शासन चालवत असताना अनेक अडचणीला सामोरे जावे लागले. तरीपण त्या डगमगल्या नाहीत. अहिल्यादेवी राज्यकारभार चालवताना अनिष्ट रूढी समाजविघातक परंपरा यांना पायबंद घातला. हुंडा देणे आणि घेणे दोन्ही अपराध मानले जाऊ लागले. दारुबंदी, सतीप्रथा बालविवाह, केशवपन या अनिष्ट प्रथा बंद केल्या. त्यांनी त्यासाठि कठोर कायदे केले व त्याची प्रभावीपने अमलबजावणी केली. अहिल्यादेवी म्हणत ज्या रूढी अंधकाराकडून प्रकाशाकडे नेतात त्या रूढी आम्हाला मान्य आहेत परंतु प्रकाशाकडून अंधाराकडे ज्ञानकडून अज्ञानाकडे नेणाऱ्या रूढी आम्हास मान्य नाही.

शासनकर्ता हा जनतेच्या पैशाचा मालक नसतो तर तो त्यांचा विश्वस्त असतो त्या पैशाची उधळपट्टी करण्याचा त्यास काहीही अधिकार नाही असे त्यांचे तत्व होते. अहिल्यादेवी यांचा राज्यकारभार समर्पित वृत्ती धर्मपारायणात, परधर्म सहिष्णुता, अन्यायाची चीड दुर्बलांचे रक्षण स्वातंत्र, समता बंधुता न्याय, विकास दुष्टांना शासन आणि गुणवंतांना आसन अशा तत्वावर चालत असे.

आपण इतिहासातील अनेक राष्ट्रपुरुषांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करतो तेंव्हा आपल्याला असे जाणवते की अशा व्यक्तीचे जीवन म्हणजे एक संघर्ष यात्राच असते. मग याला अहिल्यादेवी कशा अपवाद ठरतील. त्यांना स्वतःच्या जवळीक आप्तेष्टांचा विरह पहावा लागला. तत्कालीन समाजामध्ये एका स्त्रीने राज्यकारभार चालवावा म्हणजे एक दिव्यच शत्रू राष्ट्रांची आक्रमणे ब्रिटिशांची राज्यावरील नजर, राज्यकारभारातील अंतर्गत कलह, वाईट प्रथा बंद करण्यासाठी झालेला समाजातील दुष्ट लोकांचा विरोध अशा एक ना अनेक संकटांना त्यांनी समर्थपणे तोंड दिले कदाचित याही कारणामुळे इतिहासाला त्यांची नोंद घ्यावी लागली असेल. संधी आणि स्वकर्तृत्व यांची बेरीज म्हणजे अहिल्यादेवी होळकर. त्यांना राज्यकारभार चालवण्याची संधी मिळाल्यावर आपल्या स्व: निर्णयावर त्यांनी संधीचे सोने केले व इतिहासात आपल्या कार्याचा ठसा उमटवला. नेतृत्व कायम तडजोडीची भाषा बोलत नसते त्याचप्रमाणे त्यांनी जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांविषयी कधीही तडजोड केली नाही. अहिल्यादेवी होळकर या आपल्या समाजासाठी अखंड ऊर्जादायी प्रेरणास्त्रोत आहे. आज समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्व जाणवले आहे. त्यामुळे समाज प्रगती करत आहे. पण यावर समाधान मानून चालणार नाही. खूप मोठ्या प्रमाणात प्रगती करावयाची आहे. अडचणी खूप आहेत पण यातूनही मार्ग काढणे गरजेचे आहे. राजकीय स्तरावर आरक्षण असेल किंवा इतर मागण्या त्यासाठि सातत्याने पाठपुरावा होणे आवश्यक आहे. आपला जो हक्क आहे. त्याबाबत सर्वांनी जागरूक असणे ही खूप चांगली गोष्ट आहे. पण कर्तव्याबाबत आपण कसूर करता कामा नये. आज अहिल्यादेवी यांची जयंती साजरी करत असताना अहिल्यादेवीच्या विचारांचा व कार्याचा देदीप्यमान वारसा आपल्याला समोर ठेवून वाटचाल करावी लागेल युवकांनी आजच्या दिवशी किंवा मिरवणुकी पुरते महत्व न देता सातत्याने विधायक कार्य करत राहीले पाहिजे. युवकांनी शिक्षणं शेती उद्योग नोकरी यामध्ये झोकून देऊन अपार कष्ट करण्याची मानसिकता तयार ठेवावी. शिक्षणं तंत्रज्ञान नवीन बदल आत्मसात करुन आपली आपल्या कुटुंबाची समाजाची पर्यायाने देशाची प्रगती करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. कोणत्याही समाजाची, राष्ट्राची प्रगती तेथील युवकावरच अवलंबून असते. युवकांनी याबाबत जागृत असणे गरजेचे आहे. सामाजिक संघटनांनी देखिल समाजाची विधायक प्रगती होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. समाजाच्या शक्तीचा, वेळेचा,संपतीचा अपव्यय होणार नाही सामाजिक सलोखा बिघडणार नाही याची काळजी घ्यावी. अहिल्या देवी यांचा आदर्श समोर ठेवून वाटचाल करावी.

राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर घोड्यावर बसून युद्ध करणाऱ्या रणरागिणी होत्या. संकट समयी धैर्य दाखविणाऱ्या वीरांगना होत्या. राजदरबारात बसून न्याय देणाऱ्या शासन कर्त्या होत्या. समस्त भारतीय जनतेला पुत्रवत मानणाऱ्या संपूर्ण राष्ट्रात जन हिताचे कार्य करणाऱ्या राष्ट्रमाता होत्या. अशा या राष्ट्रमातेचे निधन १३ ऑगस्ट १७९५ साली झाले. इतिहासातील एक देदीप्यमान अध्याय संपुष्टात आला. त्यांच्या कार्य कीर्तीचा सुगंध कायम दरवळत राहील यात काही शंका नाही. अशा या भारतभूमीतील स्त्री रत्नाची २९९ वी जयंती निमित्त त्यांच्या या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

संकलन श्री.गलांडे ए. बी.(सर) (निवेदक) मो.९५६१२४९७६९.

वृंदावनी कृष्ण भक्ताच्या मयूर नृत्याने आचंबीत केले !

शिरूर कासार (प्रतिनिधी)

धाकटी अलंकापुरी सिध्देश्वर संस्थानवर महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या रसाळ वाणीतून सुरू असलेल्या भागवत कथेत वृंदावनी कृष्ण भक्ताच्या मयूर नृत्याने आचंबीत केले या कथेत बालगोपाल मनमुराद आनंद घेतात आणि महिला पुरूष भाविक देखील तालावर भक्तिप्रेमात धूंद होऊन ठेका धरतात .

गेली सहा दिवसापासून समस्त महिला हरिपाठ मंडळाच्या पुढाकारातून सिध्देश्वर संस्थानवर भागवत कथेचे आयोजन गेली तीन वर्षापासुन केले जात आहे ,याहीवर्षी मंगळवारपासून कथा सुरू असुन वेगवेगळ्या प्रसंगानूसार वृंदावन निवासी अजयभैय्या हे कथेतील पात्र साकार करून भाविकांना गोकुळ वृंदावनात असल्याची अनुभूती देत आहे ,स्वत: शास्त्रीय नृत्य पारंगत असल्याने भरत नाट्यम् , कथ्थक नृत्याचे सादरीकरण करतात ,रविवारी तर मयूर नृत्य सादर करून सर्वांनाच आचंबीत केले ,सोमवारी भगवान शंकराचे तांडव नृत्य सादर करणार असुन कथेचा समारोप मंगळवारी सकाळी विवेकानंद शास्त्री यांचे काल्याचे किर्तन आणि अशोक गायकवाड यांच्या महाप्रसादाने होणार आहे .कथेला संगिताचा साज आणि बाज मिळाल्याने कथेचा आनंद द्विगुणीत झाला होता .

श्रीमदभागवत कथेत बालगोपाळ देखील कृष्णाचे सवंगडे बनुन सहभागी !

एचपीएम कंपनीने लाजच सोडली अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील भेगा सिमेंटच्या पाण्याने बुजवण्यास सुरुवात

थातुरमातुर डागडुजी न करता ब्लॉक कट करून दर्जेदार दुरुस्तीची आवश्यकता :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील मांजरसुंभा ते केज दरम्यान येळंबघाट गावाजवळ निकृष्ट कामामुळे मोठमोठ्या भेगा पडल्याने दुचाकी वाहनचालकांच्या गाड्यांचे चाके फसुन वाहनचालकांचे नियंत्रण सुटल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असुन संबंधित प्रकरणात तातडीने भेगा बुजवण्याचे दर्जेदार काम करण्यात यावे आणि जबाबदार कंत्राटदार कंपनी एचपीएम इन्फ्रा एल एल पी कंपनीला काळ्या यादीत टाकुन जबाबदार आधिका-यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत नितिनजी गडकरी, अरविंद काळे, प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना केल्यानंतर अपर जिल्हा दंडाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांनी निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांना निवेदनातील मुद्यांबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ चौकशी करून नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी.असे आदेश काढल्यानंतर अखेर आज रस्ता कामाच्या दुरुस्तीला सुरूवात झाली आहे. मात्र एचपीएम इन्फ्रा कंपनीने नेहमी प्रमाणेच सिमेंट पाणी टाकून थातुरमातुर डागडुजीस सुरूवात केली असुन ब्लॉक कट करून दर्जेदार दुरुस्ती काम करण्याची आवश्यकता आहे त्यामुळे एचपीएम कंपनीने लाजच सोडली आहे अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते नेकनुर दरम्यान गवारी फाट्यावर पडलेल्या भेगांची थातुरमातुर दुरुस्ती केल्यानंतर पुन्हा भेगा पडल्या होत्या.शेवटी ब्लॉक कट करून दुरुस्ती करावी लागली त्याचप्रमाणे येळंबघाट येथील भेगांची ब्लॉक कट करून दर्जेदार दुरुस्ती करण्याची आवश्यकता असुन रखडलेले

दुभाजक,पुल, नाल्या आदिंची कामे एचपीएम इन्फ्रा कंपनीने तातडीने पूर्ण करावीत अशी मागणी डॉ.गणेन ढवळे यांनी केली आहे.

अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते केज दरम्यान येळंबघाट गावाजवळ मोठमोठ्या भेगा पडलेल्या असुन दुचाकी वाहनांचे चाक अडकून अपघातांच्या घटनांचे प्रमाण वाढले असुन तातडीने भेगाची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे करून दि.१० जुन रोजी आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर अपर जिल्हादंडाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांनी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या.छत्रपती संभाजीनगर यांना निवेदनातील मुद्यांबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ चौकशी करून नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.केलेल्या कार्यवाही बाबत संबंधित अर्जदार यांना परस्पर कळवुन त्यांना आंदोलन करणेपासुन तात्काळ परावृत्त करावे असे लेखी निर्देश दिले आहेत.

देवपिंपरी माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल!

चि.अभिषेक गरड प्रथम, कु.पुजा गवारे द्वितीय, कु.प्रेरणा खंडागळे तृतीय क्रमांक

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावीची परीक्षा सन २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थी हे या निकालाची आतुरतेने वाट पाहत होते. हा निकाल लागल्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. गेवराई तालुक्यातील देवपिंपरी माध्यमिक विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून दहावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून यशस्वी व चांगल्या निकालाची परंपरा राखली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

माध्यमिक विद्यालय देविपंपरी या शाळेतून इयत्ता दहावीच्या परीक्षेत ६५ पैकी ६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून चि. अभिषेक नारायण गरड ९६% प्रथम क्रमांक, कु. पुजा दत्तात्रय गवारे ९३% द्वितीय क्रमांक, कु. प्रेरणा आसाराम खंडागळे ९२% तृतीय क्रमांक पटकावला आहे. देवपिंपरी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून चांगल्या निकालाची परंपरा राखली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांची आणि देवपिंपरी माध्यमिक विद्यालयाची मान

अभिमानाने उंचावली आहे. या विद्यार्थ्यांनी दिवस-रात्र अभ्यास करून आई वडिलांच्या कष्टाचं चीज केलं आहे. मेहनत व चिकाटीच्या जोरावर हार न मानता जिद्दीने त्याच्या स्वप्नांना साकारण्यासाठी एक पाऊल पुढे टाकून दहावीत चांगले गुण संपादन केले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक संघर्षमय वाटचालीसाठी अभिनंदन व शुभेच्छा मिळत आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन नवनिर्माण संस्था सचिव मा. रामकृष्णजी बांगर, प्राचार्य सौ. सत्यभामाताई बांगर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष विजयसिंह बाळा बांगर, व देवपिंपरी गावचे आजी माजी सरपंच, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, देवपिंपरी गावचे शिक्षण प्रेमी, गावातील नागरिक, तसेच शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक शिक्षकेतर, कर्मचारी या सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुष्प गुच्छ देऊन सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या

संगमेश्वर विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

नाळवंडी । अमोल जाधव

नुकत्याच झालेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल राज्य शिक्षण मंडळाने २७ तारखेला जाहीर केला,या निकालाकडे सगळ्यांची ओढ लागलेली होती,सगळ्यांना पडलेलं होत ते म्हणजे टक्केवारी..मात्र शेतमजुराची मुलगी जेव्हा दहावी मध्ये ९३.४०% गुण घेऊन उत्तीर्ण होते तेव्हा आई वडिलांच्या डोळ्यात पाणी येतं.एक बापाला आपल्या लेकी कडून काय अपेक्षित आहे हे या मुलीकडून शिकावे.संगमेश्वर विद्यालय नाळवंडी येथे शिकत असलेली गरीब बापाची लेक आज जेव्हा शाळेमध्ये तिसरा क्रमांक मिळवते तेव्हा समाजात ,बापाची मान उंचावते,हर्षदा जाधव या मुलीने अतिशय हालाकीच्या परिस्थिती मध्ये आपल्या यशाची बाजी मारलेली आहे,आई वडील शेत मजुरी करून आपल्या मुलीला शिकवतात,बापाने टाकलेल्या विश्वासाला तडा न जाऊन देता,बापाला दिलेल्या शब्दाची वचनपूर्ती या मुलीने आज पूर्ण केली,तिने प्रत्येकी विषयाला पुढील प्रमाणे मार्क घेतलेले आहेत,मराठी ९२ मार्क,हिंदी ८१ मार्क, इंग्रजी ८९ मार्क,गणित ९४ मार्क,विज्ञान ९६ मार्क,सामाजिक शास्त्र ९६ असे टोटल ५००/४६७ मार्क घेऊन उत्तीर्ण झाली,,आज तिच्या वर तिच्या परिवाराकडून,आणि शाळेकडून शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे तसेच आज हर्षदा जाधव या मुलीचा सत्कार करून तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या,,या वेळी उपस्थित युवा पत्रकार अमोल जाधव,देविदास जाधव,रणजित जाधव,युवराज जाधव,अमोल गव्हाणे,आदी उपस्थित होते.

मोफत त्वचारोग तपासणी शिबिर आणि ५०% सूट चा लाभ घ्यावा - डॉ. पूनम भालेराव

बीड (प्रतिनिधी)

शहरातील स्किनोवेशन क्लिनिक, स्किन, हेअर अँड लेसर सेंटर, बी.एच.एम.एस. कॉलेजच्या बाजूस, सिद्धी फोटो स्टुडिओ शेजारी, माने कॉम्प्लेक्स रोड, बीड येथे येत्या शनिवार रोजी दिनांक १ जून २०२४ रोजी सकाळी १०:०० ते संध्याकाळी ०५:०० पर्यंत मोफत त्वचारोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दिनांक २० जून २०२४ पर्यंत विविध सुविधांवर ५०% सूट ही देण्यात येणार आहे. या शिबिराचा व सूटचा गरजवंत रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. पूनम भालेराव यांनी केले आहे.

या शिबिरामध्ये पिंपल्स (मरूम), वांग, चेहऱ्यावरील सुरकुत्या, डोळ्याखालील काळे डाग, कोरडी त्वचा, नखांचे आजार, गजकर्ण, पांढरे डाग (कोड), सोरियासिस, स्ट्रेच मार्क (व्रण), त्वचेचे सर्व आजार, सनटेन ट्रीटमेंट, स्कीन टायटनिंग, केस गळती, केसातील कोंडा, केसांची वाढ खुंटणे, हायड्रोफेशियल (डव्हान्स मशीनद्वारे), मायक्रो नीडलिंग, पी.आर.पी. (केसांसाठी व त्वचेसाठी), लेझर मशीनद्वारे शरीरावरील अनावश्यक केसांसाठी उपचार, टॅटू-गोंदण काढणे, केमिकल पिलिंग, मस-चामखीळ काढणे, इत्यादींची तपासणी शिबिरात मोफत केली जाणार आहे. याकरिता शिबिरात तपासणी करायची असल्यास रुग्णांनी ८०८०९७३५९८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून नाव नोंदणी करावी किंवा शिबिरापूर्वी स्किनोवेशन क्लिनिक, स्किन, हेअर अँड लेसर सेंटर, बी.एच.एम.एस. कॉलेजच्या



बाजूस, सिद्धी फोटो स्टुडिओ शेजारी, माने कॉम्प्लेक्स रोड, बीड येथे प्रत्यक्ष संपर्क साधून १ जून रोजी मोफत तपासणी आणि २० जून पर्यंत विविध सुविधांवर ५०% सूट चा लाभ घ्यावा. असे आवाहन डॉ. पूनम भालेराव यांनी केले आहे.

केशवराज माध्यमिक विद्यालय दासखेड एस.एस.सी २०२४ चा १००% निकाल

रयत शिक्षण संस्थेचे केशवराज विद्यालय दासखेड ता. पाटोदा या विद्यालयाचा मार्च २०२४ दहावी बोर्ड परीक्षा निकाल १००% लागलाआहे.या विद्यालयातून प्रथम क्रमांक येण्याचा मान १कोकाटे सुमित दत्तात्रय याला ९४% गुण मिळाला दुसरा क्रमांक कु. वाघअपेक्षा गोपाल हिला शेकडा ९३%०० टक्के गुण मिळाले.तिसरा क्रमांक कु.वाघ सानिका गोकुळ हिला ९२ टक्के गुण मिळाले या विद्यालयाचे तीन विद्यार्थी ९०% च्या वर आहेत तर २४ विद्यार्थी ८०% च्या वर आहेत.

तसेच अनेक विद्यार्थी होतकरू आणि हुशार आहेत या विद्यालयात एन एम एम एस परीक्षेत तीन विद्यार्थी धारक आहेत. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत सहा विद्यार्थी पात्र आहेत. या विद्यालयात गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम घेतले जातात इयत्ता दहावीच्या परीक्षेत प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. यामध्ये दासखेड गावचे भूमिपुत्र श्री कृष्णाजी जाधव साहेब जिल्हाधिकारी मुद्रांक शुल्क मुंबई यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.रयत शिक्षण संस्था अहमदनगर विभागीय अधिकारी श्री नवनाथजी बोडके साहेब, सहाय्यक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवडी साहेब तसेच प्रमोद तोरणे साहेब यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.तसेच गावचे सरपंच श्री.मधुकर कोकाटे उपसरपंच श्री.मधुकर शेलार स्कूल कमिटी सदस्यश्री.चंद्रहंस कोकाटे श्री. भाऊसाहेब कोकाटे श्री.बंडू वाघिरे तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री पांडुरंग कोकाटे शिवाजी अण्णा कोकाटे राजेंद्र भोपळे गणेश कोकाटे माजी सभापती.श्री.केशव रसाळ श्री गणेश कोकाटे युवराज कोकाटे गौतम वाघिरे अशोक आरगडे भीमराव कोकाटे पत्रकार अविनाश पवार दत्ता कोकाटे मंगेश कोकाटे आदी ग्रामस्थानी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच गावचे भूमिपुत्र ग्रह खात्याचे उपसचिव रवींद्र आवटे साहेब. तसेच माझी कर आयुक्त रानोजी ठोंबरे साहेब दिगंबर गुरुजी सुंदरराव कोकाटे पाटील. तात्या वाघिरे विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक दहावीचे वर्गशिक्षक श्री मिसाळ सर इंग्रजी विषय शिक्षक श्री कवडे सर श्री धोंडे सर श्री उबाळे सर उडगे सर श्री कांबळे सर श्री जोगदंड सर श्रीमती देवकर मॅडम तसेच बाळू मोरे लेखनिक प्रियंका कोकाटे मॅडम श्रीमती बेबीताई गिलडा मॅडम कोकाटे नाना शिक्षकांनी व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यासाठीशुभेच्छा दिल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान कोणीही सहन करणार नाही - राजेंद्र मस्के

भाजपातर्फे पुतळा दहन करून जितेंद्र आव्हाडांचा जाहीर निषेध..!

बीड (प्रतिनिधी)

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडून आमदार जितेंद्र आव्हाडांनी केलेली चूक अक्षम्य आहे. पोटात एक आणि ओठात एक ठेऊन महामानवाचा अपमान करण्याचे धाडस निषेधार्थ आहे. भारतीय इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंदोलनामुळे महाड येथील चवदार तळ्याला अनन्य साधारण महत्व आहे. अशा क्रांतिकारी स्थळावर जाऊन जितेंद्र आव्हाडांनी प्रसिद्धीच्या झोतामध्ये येण्यासाठी हि स्टंटबाजी केली. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी डॉ. बाबासाहेबांचा फोटोही त्यांनी फाडला. यापूर्वी अनेक थोर पुरुषांचा अपमान आव्हाडांनी केलेला आहे. देशातील कोणताही नागरिक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान कदापीही सहन करणार नाही. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला घटनेच्या कोणत्याही

पदावर राहण्याचा अधिकारी नाही. जितेंद्र आव्हाड यांनी केलेली अक्षम्य चूक लक्षात घेता त्याचां तातडीने राजीनामा घेतला पाहिजे. अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली.

आज संघर्ष योद्धा भाजपा जनसंपर्क कार्यलय समोर बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने आमदार जितेंद्र आव्हाडांच्या पुतळ्याचे दहन करत निषेध व्यक्त केला. यावेळी नवनाथ शिराळे, बालाजी पवार, प्रमोद रामदासी, केशव बडे, अमोल वडतिले, बद्रीनाथ जटाळ, लालासाहेब पन्हाळे, राजू शहाणे, अनिल शेळके, बंटी भिसे महेश सावंत, विलास काकडे, अश्विन शेळके, महादेव नैराळे, विशाल पाखरे, मनोज आगे, शफिक भाई काजी, राम चव्हाण, गणेश शेंडगे, सचिन जाधव, सचिन मस्के, स्वप्नील मस्के, रवींद्र कळसाने, राम बहिरवाळ, प्रल्हाद चित्रे, दिलीप डोंगर आदि उपस्थित होते.

मिल्लीया माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

किल्ले धारूर । प्रतिनीधी

अंजुमन इशाते तालीम संचलित किल्ले धारूर येथील मिल्लिया माध्यमिक विद्यालयाने शालांत प्रमाणपत्र परीक्षा परीक्षेत यशाची घोडदौड कायम ठेवली असून प्रति वर्षीप्रमाणे याही वर्षी तालुक्यातून निकालात अव्वल स्थान प्राप्त केले आहे मार्च २०२४ च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत मिल्लिया माध्यमिक विद्यालयाचा एकूण निकाल १००% टक्के एवढा लागला असून शाळेतून प्रथम येण्याचा मान कुमारी सबा अनिस शेख ८२.६०% गुण घेऊन मिळवला तर द्वितीय क्रमांक ८०.६०% तर पठाण सदफ फातेमा याने ७८.००% गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळवला आहे.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक काजी जैनुल आबेदिन यांनी अभिनंदन केले या वेळी मिल्लिया प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अमन पटेल, व शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षिका,आदी उपस्थित होते.

सप्तखंजरीवादक सत्यपाल महाराजांच्या समाजप्रबोधन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा.दत्ताभाई प्रभाळे

बीड (प्रतिनिधी)

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ वी जयंतीनिमित्त समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमास प्रबोधनकार, पुरोगामी किर्तनकार, समाजसुधारक सत्यपाल महाराज एकाच वेळेस सात वाद्य वाजवून बुद्ध, शिव, होळकर, फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार अत्यंत प्रामाणिकपणे, तळमळीने, निष्ठेने, निस्वार्थ भावनेने घरोघरी पोचविणारे हसता-हसता लोकप्रबोधन करणारे आधुनिक संत सत्यपाल महाराज यांच्या या समाजप्रबोधनाच्या कार्यक्रमास बीड शहर व शिदोड परिसरातील सर्व समाजबांधवांनी आवर्जून उपस्थित राहावे.

सप्तखंजिरी वादक, प्रबोधनकार श्री.सत्यपालजी महाराज यांनी गेल्या ५० वर्षांपासून सत्यपाल महाराज आपल्या कीर्तनातून समाजप्रबोधनाचे काम करीत आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांच्या विचारांचा वारसा सत्यपाल महाराजांनी पुढे नेला आहे. सत्यपाल महाराजांचे कीर्तन म्हणजे सर्वांसाठी एक पर्वणीच असते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा



यांच्या जीवनाचे विविध पैलू समजून घेता आले. सत्यपाल महाराज यांच्या भेटीतून नेहमीच एक वेगळी ऊर्जा प्राप्त होते.

आपणांस कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ वी जयंतीनिमित्त समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम समाजसुधारक सप्तखंजीरीवादक सत्यपाल महाराज दिं ३१ मे २०२४ रोजी सांय.७:०० वाजता शिदोड. ता. जि.बीड येथे मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते प्रा . दत्ताभाई प्रभाळे, यांनी केले.

माझ्या कार्यकर्त्यांवर खोटेनाटे गुन्हे दाखल करू नका; नाही तर ४ जूननंतर हिशोब चुकता करेन

नीलेश लंके यांनी भाजपच्या पदाधिकार्यांना ठणकावले

कोनोशी येथे राजेंद्र दौंड यांच्या वाढदिवस समारंभाला सर्वपक्षीय नेत्यांची मांदियाळी!

शेवगाव/प्रशांत बाफना

मला लोकसभेच्या निवडणुकीत सर्व राजकीय पक्षांनी मदत केली असल्याने मी सर्वपक्षीय कार्यकर्ता असून, सत्ताधारी भाजपच्या पदाधिकार्यांनी निवडणुकीनंतर आकसबुद्धीचे राजकारण करून कार्यकर्त्यावर खोटेनाटे गुन्हे दाखल करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. ते त्यांनी करू नयेत, अन्यथा ४ जूननंतर सर्व हिशोब चुकता केल्याशिवाय गप्प बसणार नाही, असा खणखणीत इशारा अहमदनगर लोकसभा मतदार संघातील महाआघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी दिला आहे. शेवगाव तालुक्यातील कोनोशी येथे युवानेते राजेंद्र दौंड यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून नीलेश लंके बोलत होते.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व केदारेश्वर कारखान्याचे माजी अध्यक्ष प्रतापराव ढाकणे, शिवशंकर राजळे, ज्येष्ठ नेते दिनकर पालवे, शिवसेना नेते रामदास गोल्हार, रफिक शेख, केदारेश्वर कारखान्याचे संचालक श्रीमंत गव्हाणे, गहिनीनाथ शिरसाट, भाजपचे बंडू रासने, शेवगाव बाजार समितीचे सभापती

एकनाथ कसाळ, युवानेते नंदकुमार मुंडे, शिरीष काळे, बोधेगावचे उपसरपंच संग्राम काकडे, मयूर हुंडेकरी, बालमटाकळीचे उपसरपंच घोरपडे, शिंदे गटाचे शेवगाव तालुका अध्यक्ष साईनाथ आधाट, नामदेव कसाळ, वंचित आघाडीचे उमेदवार दिलीप खेडकर, नवनाथ खेडकर यांच्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. राजेंद्र दौंड यांना अनेकांनी शुभेच्छा दिल्या तर माजी आ. नीलेश लंके म्हणाले, की पैसे कमविण्यापेक्षा जीवाभावाची माणसं सोबत असली तर जीवनात काही कमी पडत नाही. मी प्रस्थापितांच्या विरोधात सामान्य जनतेला नेहमी भरीव मदत केली आहे. माझी प्रस्थापितांच्या विरोधात लढाई सुरू आहे. लोकसभेत चारपिढ्या राजकारण करणार्यांच्या (सुजय विखे यांचे नाव न घेता) मोठ्या लोकांच्या विरोधात लढणे हे सोपे काम नव्हते, पण जिवाभावाचे सामान्य लोक व सर्वपक्षीय कार्यकर्ते तसेच अनेक नेत्यांनी मला निवडणुकीत भरीव मदत केली असल्याने मोठ्या फरकाने विजय होणार असल्याचे लंके यांनी जाहीरपणे सांगून, सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा आभारी असल्याचे ते म्हणाले. मला असंख्य अदृश्य राजकीय शक्तीने मदत केली आहे, कोणी कोणी मदत केली आज जाहीर करणार नाही पण निकालानंतर सर्व कळणार आहे, असेही लंके म्हणालेत.

आमच्यावर सातत्याने गुंडगिरीचा आरोप केला जात आहे, पण आम्ही गुंड नाहीत तर गरिबाला छळणारांचा बंदोबस्त करून गुंडगिरी थांबविण्यासाठी प्रयत्न केला आहे.

लोकसभा निवडणुकीतील राजकीय मतभेद बाजूला ठेवून समाजात शांतता राखा - एपीआय नारायण एकशिंगे

सर्व समाजातील नागरिक, युवकांनो सोशल मीडियावर जातीवाचक वादग्रस्त पोस्ट टाळाव्यात!

गेवराई (प्रतिनिधी)

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जाती-जाती तेढ निर्माण होत असून सोशल मीडियावर उगाच विनाकारण जातीयवाद पोस्ट करून व आपले दैनंदिन मतभेद विसरू नका, शांततेत राहावे असे आव्हान चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी गेवराई तालुक्यातील कोळगाव तांदळा काजळा येथील दि.२८ मे रोजीच्या शांतता बैठकीत केले आहे. यावेळी गावातील नागरिक युवक विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीचे मतदान दि.१३ मे २०२४ रोजी पार पडले, परंतु मागील आठ दिवसांमध्ये बीड जिल्ह्यातील लोकसभेचे दोन गटात जातिवाद चांगली चुरस निर्माण होत आहे. माझा नेता मोठा तुझा नेता लहान. हा नेता निवडून येईल किंवा पडेल यामध्ये वादळ रस्सीखेच झाली, तर काही ठिकाणी तर वादाचे वातावरण तयार झाले, त्यामुळे पोलिसात गुन्हे तक्रारी दाखल झाल्या, यामध्ये काही विघ्नसंतोषी राजकारणी लोक नाहक सर्वसामान्य कार्यकर्त्यांना वाद विवाद करतात. बीड जिल्ह्यात यामुळे मराठा वंजारी ओबीसी असा तणावग्रस्त वातावरण निर्माण झाले

असून, बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या नेतृत्वाखाली शांतता राखण्यासाठी चकलांबा पोलिसांच्या वतीने ठाण्याच्या कार्यक्षेत्रात शांतता बैठकीचे आयोजन करून प्रबोधन करण्यात येत आहे. कोळगाव वीट अंतर्गत काजळा, तांदळा तसेच बंगाली पिंपळा, शेकटा आदी ठिकाणी दि.२८ मे रोजी शांतता बैठकीचे आयोजन करून मार्गदर्शक सुचना सांगितल्या, त्याचबरोबर सर्व सामाजातील प्रत्येक युवकाने नागरिकांनी जातीवाचक वादग्रस्त विधान फेसबुक, व्हाट्सअप तसेच सोशल मीडियावर पोस्ट टाळल्या पाहिजेत. त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीचा निकाल दि.०४ जून २०२४ रोजी लागणार आहे. यामध्ये निकाल कोणाच्याही बाजूने लागो त्या विजयी नेत्यांची मिरवणूकीत डिजेला पुर्णतः बंदी आहे. जो डिजे वाजेल त्यावर गुन्हा दाखल होईल, सोशल मीडियावर उगाच विनाकारण जातीयवाद पोस्ट करू नये, आपले दैनंदिन मतभेद विसरू नका. शांततेत राहावे असे आवाहन चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांनी केले आहे. यावेळी चकलांबा पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल खटाणे, रमेश करांडे, ड.कृष्णा लोंढे सर कोळगावकर, पत्रकार बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब लोंढे, अविनाश गवळी, महारूद्र येडे, सखाराम आजबे, दादा पांगरे आदी नागरिक युवक उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT